नोंदणी क्र. -एफ ९३४/मुंबई/१९६२

# महाराष्ट्र राज्य टंकलेखन-लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई

७९,के.टी.आय, महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, अहमदनगर -४१४००१.

दुरध्वनी क्र.०२४१ २३२२६३९, मो.नं. ९४२२२२१९०८

वेबसाईट - www.msceia.com ईमेल - karaleprakash1908@gmail.com / msceia.1962@rediffmail.com

प्रकाश भि. कराळे - अध्यक्ष     हेमंत नि. ढमढेरे -जनरल सेक्रेटरी     दिनेश रं. पोरे - वरिष्ठ उपाध्यक्ष

**जा.क्र.** मराटंलशासंसं/ शा.वा.प्रमाणपत्र-संगणक अर्हता/पदभरती/शा.आ.अंमलजावणी/००७/२०२१    **दिनांक :** १२/७/२०२१

प्रति,

----------------------------

----------------------------

----------------------------

**विषय :- प्रशासनातील गट अ,ब,क संवर्गातील पदभरती/पदोन्नती व संगणक अर्हतेबाबत शासन आदेशाचे अंमलबजावणी करणेबाबत. .**

**संदर्भ :-** १) शासनआदेश शालेय शिक्षण क्रिडा विभाग महाराष्ट्र राज्य आदेश क्रमांक एसपीई/ १०१२ / (१०८) /१२सा.शि.१ दि. ३१ ऑक्टोबर २०१३

२) राजपत्र शासकिय कार्यालयातील ''लिपीक टंकलेखक'' गट क सेवा प्रवेश नियम २०१७ दि.६ जुन २०१७ व २१ फेब्रुवारी २०१८.

३) शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, मातंस२०१२/प्र.क्र.२७७/३६ दि. ४ फेब्रु.२०१३ संगणक अर्हता परीक्षेबाबत.

४) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासन पुरक पत्र क्र.मातंस/२०१२/ प्र.क्र.२७७/३९ दि. ८ जानेवारी २०१८.

५) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासन पुरक पत्र क्र.मांतस /२०१२ / प्र.क्र.२७७/३९ दि.१६जुलै२०१८.

६) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) शासन परिपत्रक क्र. मातंस/ १८२० / प्र.क्र. ९७/से-५/३९ दि.५फेब्रुवारी २०२१. शासकिय सेवेतील गट अ,ब,क संवर्गातील पदभरती जाहिरातीमध्ये संगणक अर्हतेबाबत पुरक पत्रांचा संदर्भ देणेबाबत.

महोदय,

कृपया विषयात नमुद केलेल्या महत्वपुर्ण मागणीनुसार विनंती की, संदर्भातील शासन आदेश १ ते ६ चे अवलोकन करुन उचित कार्यवाही करावी.

२/- थोडक्यात संघटनेच्या वतीने विनंतीपुर्वक कळवितोत की, महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. १ नुसार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे या स्वायत्त संस्थेमार्फत जीसीसी (टंकलेखन) अभ्यासक्रमास समकक्ष संगणक टंकलेखन (गर्व्हनमेंट सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर टायपींग बेसिक कोर्स इंग्रजी, मराठी, हिंदी ३०,४० श.प्र.मि. हा ६ महिने मुदतीचा शासकिय

वाणिज्य प्रमाणपत्र कोर्स शासनमान्य टंकलेखन संस्थेत सुरु केलेला असुन त्यास मॅन्युअल टायपींग कोर्स ची समकक्षता दिलेली आहे. शासन आदेश दि. ३१ ऑक्टोबर २०१३ सोबत जोडला आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत जीसीसी-टीबीसी (संगणक टंकलखेन) परीक्षेचे २०१५ पासुन संचलन करणेत येत आहे. या अभ्यासक्रमांचा नोकर भरती मध्ये गट क व ड संवर्गातील पदभरतीसाठी शासनाने बृहन्मुंबई व बृहन्मुंबई बाहेरील व बृहन्मुंबईतील शासकिय कार्यालयातील ''लिपीक टंकलेखक'' गट क (सेवा प्रवेश) नियम २०१७ अधिसुचना (राजपत्र) दि. ६ जुन २०१७ व दि.२१ फेब्रुवारी २०१८ रोजी प्रसिध्द केलेले असुन नोकर भरतीसाठी संगणक टंकलेखन प्रमाणपत्र मराठी ३०श.प्र.मि. व इंग्रजी ४० श.प्र.मि. सक्तीचे केलेले आहे. संदर्भ क्र. २ शासन आदेश राजपत्र असाधारण भाग चार - अ सोबत जोडलेले आहे.

शासन आदेश दि.३१ ऑक्टोबर २०१३ नुसार सुरु झालेला जीसीसीटीबीसी (संगणक टंकलेखन) गर्व्हनमेंट सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर टायपिंग बेसिक कोर्स इंग्रजी, मराठी, हिंदी ३०,४०,श.प्र.मि. या ६ महिने मुदतीच्या अभ्यासक्रमास संदर्भातील अ.क्र. ३,४,५ शासन आदेश क्र. शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, मातंस२०१२/ प्र.क्र. २७७/३६ दि. ४ फेबु. २०१३, शासन आदेश महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासनपुरक पत्रक्र.मातंस/२०१२/प्र.क्र.२७७/३९दि.८जानेवारी२०१८व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासन पुरक पत्र क्र.मांतस /२०१२ /प्र.क्र.२७७/३९ दि.१६ जुलै २०१८ अन्वये MS-CIT अभ्यासक्रमांची समकक्षता दिलेल्या अभ्यासक्रमांना संगणक अर्हतेमध्ये सामाविष्ट केलेले आहे. सोबत शासन आदेश जोडलेले आहे.

शासनाने संदर्भ क्र. ३ मधील दि.४ फेबुवारी २०१३, दि.८ जानेवारी २०१८ व दि.१६ जुलै २०१८ संगणक अर्हतेबाबतचे आदेश देवुनही अंमलबजावणी होत नसल्याने पुन्हा शासन आदेश सामान्य प्रशासन (मातंस) १८२०/ प्र.क्र.९७/ से.५/३९ दि.५ फेब्रुवारी २०२१ अन्वये संदर्भातील आदेश क्र.२,३,४ हे शासनाचे सर्व विभाग, कार्यालय, महामंडळे,स्वायत्त संस्था /उपक्रम यांना नोकरभरतीच्या जाहिरातीमध्ये उल्लेख करणे. संगणक अर्हता ग्राहय धरणे बंधनकारक केलेले आहे. शासन आदेश सोबत जोडले आहे.

सबब या पत्राव्दारे आपणांस कळविणेत येते की, प्रशासनातील गट अ,ब,क पदभरती / पदोन्नती कामी संदर्भातील शासन आदेश क्र.१,२,३,४,५,६ ची अंमलबजावणी करण्यात यावी हि विनंती. शासकिय सेवेसाठी गट अ,ब,क संवर्गातील अधिकारी / कर्मचारी साठी महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी) वापराबाबतचे ज्ञान आवश्यक असल्याचे नियम १९९९ च्या नियम ३ अन्वये आवश्यक असणारी संगणक अर्हता संदर्भातील अनु.क्र. २,३ व ४ शासन निर्णय पुरकपत्राव्दारे निश्चित करण्यात आलेली असून संदर्भातील अ.क्र.६ शासन आदेशान्वये बंधनकारक करण्यात आलेले आहे. या बाबीची नोंद घेऊन पदभरतीच्या जाहिराती व पदोन्नतीमध्ये संदर्भातील शासन आदेशाचा पालन न झाल्यास संघटनेच्या वतीने योग्य त्या न्यायालयात न्याय मागण्यात येईल या कामी होणा-या परिणामास आपण व आपले कार्यालय जबाबदार राहिल याची नोंद घ्यावी.

कळावे,

**प्रत :- माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर** **आपला विश्वासु**

१.मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

कृपया आपणही संबंधितांना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र जीसीसी-टिबीसी (संगणक टंकलेखन) पदभरती व संगणक अर्हता कामी संदर्भातील शासन आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत कळवावे हि विनंती.